प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 6 MARCH 2012 Rs. 25

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

जर मी नवयुग–आध्यात्मिकतेबद्दल बोलायला सुरुवात केली तर कदाचित भुवया उंचावतील, प्रश्नांची सरबत्ती होईल आणि लोक टीकाटिप्पणी करतील. मला त्याची जाणीव आहे. मला पण हे मान्य आहे की, जुन्या आणि नव्या युगासाठी आध्यात्मिकता ही वेगवेगळी असू शकत नाही. ती सर्व काळांसाठी एकच असते. पण प्रचलित आध्यात्मिकता, मागील कित्येक शतकांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात विपर्यस्त झाली आहे. प्राचीन ऋषी–मुनींनी आणि आध्यात्मिक महात्म्यांनी आपल्याला जशी शिकवली होती तशी आता अजिबातच ती राहिलेली नाही. ही दुःखाची गोष्ट आहे की, प्रचलित आध्यात्मिकता आता धार्मिक विधी व कर्मकांडामुळे आध्यात्मिकतेच्या गाभ्यापासून वेगळी होऊन जास्त धार्मिक स्वरूपाची झाली आहे. प्रचलित आध्यात्मिकतेचा हा नैसर्गिक ऱ्हास मागील मोठ्या कालावधीत झालेला आहे. आपण हे लक्षात घ्यायला हवे. मागील कित्येक शतकांमध्ये प्रचलनात आणलेले पण आध्यात्मिक नसलेले धार्मिक विधी आणि अंधश्रद्धायुक्त कर्मकांडांना ओळखण्यात लोकांना मदत करण्याची वेळ आता आलेली आहे. खोलवर रुजलेल्या भावना आणि पक्की मते अशा फारच नाजूक बाबींना स्पर्श करणे हे काही सोपे काम नाही. धार्मिक अधिकाऱ्यांनी जर अनावश्यक गोष्टी काढून धर्माचे आध्यात्मिक वैभव पुन्हा पुनर्स्थापित केले तर हे काम सोपे होईल. पण ते असे धाडसी आणि जोखमी क्रांतिकारी पाऊल उचलतील असे मला वाटत नाही. कोणताही धोका न पत्करता ते, त्यांचा पारंपारिक व्यवसाय सुरू ठेवतील.

पण काळ बदलतो आहे. आता नवी आव्हाने, नव्या ऊर्जा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नवी जागृती घडते आहे. त्याशिवाय नवे ज्ञान, जास्त ज्ञान उपलब्ध आहे. कधी कधी आपल्याला प्रकर्षाने असे वाटते की, हे जीवन आध्यात्मिकरीत्या जगण्याकरिता आपल्याला जास्त स्पष्ट आणि तंतोतंत मार्गदर्शन मिळायला हवे. आणि ह्याच पार्श्वभूमीवर मी 'नवयुग–आध्यात्मिकता' हे शब्द वापरण्याचे धाडस केले आहे. आपण लवकरच नवयुगात प्रवेश करणार आहोत हे जाणून घेणे फार आवश्यक आहे. आपल्याला हे माहीत असायला हवे की आध्यात्मिकता काय आहे कारण या आध्यात्मिकतेचे आचरणच आपल्याला नवयुगाकडे नेईल. शुद्ध आध्यात्मिक काय आहे, हे समजणे माझ्यासाठी थोडे सोपे होते कारण मी ते एका महान ऋषी, महर्षी अमरांकडून शिकलो. महर्षी अमर एक सच्चे नवयुग–गुरू होते. उच्च जगात वावरणाऱ्या, पृथ्वीवरील घडामोडींचे निरीक्षण करणाऱ्या आणि त्यांनी निवडलेल्या माध्यमांच्या मदतीने लोकांना नवयुगात प्रवेश करण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या ऋषींच्या सतत संपर्कात राहत असल्यामुळे, नवयुगाबद्दल पुष्कळ मोठ्या प्रमाणावर ज्ञान त्यांना प्रत्यक्ष ज्ञात होते.

आध्यात्मिकता जुनी किंवा नवी, ही एक मूल्य व्यवस्था असते. आध्यात्मिक असणे म्हणजे चांगले, प्रामाणिक, शांतीपूर्ण असणे होय. आध्यात्मिक असणे म्हणजे प्रेमयुक्त आचरण करणे होय; आपल्या आचरणातून प्रकाशाला व्यक्त करणे होय; सर्व जीवनाचा, निसर्गाचा आदर करणे होय; सर्व गोष्टींचा आदर करणे होय कारण प्रत्येक गोष्टीत तेच चैतन्य आहे जे आपण बाळगतो. आध्यात्मिकता म्हणजे स्वातंत्र्यात राहणे होय आणि इतरांच्या स्वातंत्र्याचा पण आदर करणे होय; आपण ज्या समाजात राहतो त्याच्या नियमांचा आदर करणे होय. आध्यात्मिकता म्हणजे स्वयं–शिस्त पाळणे आणि समाज व देशाने ठरवलेल्या शिस्तीचा आदर ठेवणे होय. आध्यात्मिकता म्हणजे सत्याच्या सतत शोधात असणे आणि ईश्वरी इच्छेसोबत एकतान होणे होय. आध्यात्मिकतेत कोणत्याही प्रकारचा विवाद नसतो; आक्रमण नसते; विभाजन नसते.

आता आपली देवाबद्दल जी कल्पना आहे, त्या कल्पनेवर विश्वास ठेवणे आवश्यक नाही. पण आपण देवाला या सृष्टीच्या, जीवनमरणाच्या पाठीमागे असणारी प्रज्ञा म्हणून ओळखू. नवयुग–आध्यात्मिकता सर्व सीमा मिटवून एकात्मकता आणते. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/–
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट
एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



११–०२–२०१२ – आयगुरुजी सत्रादरम्यान एक विनोदी क्षण

### काही ठळक घडामोडी

- १–२–२०१२ रोजी आनेकल येथे आणि ५–२–२०१२ रोजी तपोनगर येथे झालेल्या महर्षी अमर जयंती समारंभात ५०० पेक्षा अधिक लोकांनी भाग घेतला.
- ५–२–२०१२ रोजी तपोनगर येथे झालेल्या महर्षी अमर जयंती समारंभाच्या प्रसंगी चार पुस्तके प्रकाशित करण्यात आली – गुरुजींनी लिहिलेले "Master-Pupil Talks" इंग्रजी व कन्नड भाषेत, सीमा अलमेल लिखित "iGuruji (Vol. 6)" आणि स्टडी सेंटर चे "Light Body and Other Realities".
- २०–०२–२०१२ रोजी तपोनगर येथे महाशिवरात्री निमित्त विशेष ध्यान आयोजित करण्यात आले.

बुधवार, ४–४–२०१२ रोजी सकाळी ११ वाजता तपोनगर येथे विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन वर्ग आयोजित करण्यात येईल. बाहेरील विद्यार्थ्यांना देखील इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारणाद्वारे ह्यात भाग घेता येईल. भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी ३०–३–२०१२ पर्यंत आपले नाव नोंदवावे. सविस्तर माहिती साठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष ग्रुपच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुरुवार | शुक्लाष्टमी |
| ०३ | शनिवार | शुक्ल दशमी |
| ०७ | बुधवार | कामदहन |
| १५ | गुरुवार | कृष्णाष्टमी |
| २० | मंगळवार | शिवरात्री |
| २२ | गुरुवार | अमावास्या |
| २३ | शुक्रवार | गुढीपाडवा |
| ३१ | शनिवार | शुक्लाष्टमी |

### तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत<br>– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार ११ | – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार १८ | – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता |

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, १०–३–२०१२ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

स्पीकिंग ट्री वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

## “लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट” बद्दल वृत्तांत

- शालेय आधिकाऱ्यांकडून मिळालेल्या प्रचंड सहयोगामुळे १ फेब्रुवारी २०१२,‘वर्ल्ड चॅनल्स डे’ ला सहा लाखांपेक्षा अधिक मुलांनी आणि शिक्षकांनी प्रकाश प्रवाहित केला.
- मे २००८ मध्ये सुरू केलेल्या “लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट” ला ह्या वर्षी मे महिन्यात चार वर्षे पूर्ण होतात. ७ मे २०१२ रोजी बंगलोर येथे “लाइट चॅनल्स मीट” आयोजित करण्यात येईल. जगातील सर्व भागांतून अनेकजण आपापल्या जागांतून मानसिक संपर्क साधून आणि प्रकाश प्रवाहित करून ह्यात सहभागी होऊ शकतील. ह्यात भाग घेण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

पूर्वी मी मित्रांशी किंवा शाळेतील इतर विद्यार्थ्यांशी बोलताना सर्रास अपशब्द वापरीत होतो. प्रकाश प्रवहन करायला लागल्यापासून त्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे.

– हर्षल चौधरी, विद्यार्थी, गाडगे महाराज रेसिडेंशियल स्कूल, मुंबई

१ फेब्रुवारी ला प्रकाश प्रवहनाच्या सत्रासाठी स्वयंसेवक म्हणून काम करायचे वचन दिले असल्याने मी माझ्या साहेबांना विनंती केली की मला ऑफिसमध्ये कामासाठी दोन तास उशीरा येण्याची परवानगी द्यावी. त्यांनी माझी विनंती नाकारली आणि मला कामाला वेळेवर यायची कडक सूचना दिली. मी खूप निराश झाले आणि प्रकाशास मदतीसाठी प्रार्थना केली. त्या रात्री माझ्या साहेबांनी फोन करून मला परवानगी दिली. ह्या संपूर्ण घटनेबाबत मला खूप आनंद झाला आणि मी रोमांचित झाले.

– अलकनंदा, प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

१ फेब्रुवारी ला आम्ही एका शाळेतील मोठ्या हॉलमध्ये प्रकाशाचे प्रवहन करीत होतो. त्या हॉलमध्ये खूप चिमण्या होत्या. जेव्हा आम्ही प्रवहन सुरू केले तेव्हा त्या चिमण्या जोरात ‘चिव चिव’ आवाज करीत होत्या. मला वाटले की त्या आवाजाने विद्यार्थ्यांना त्रास होईल. मी त्यांना त्या आवाजाकडे दुर्लक्ष करून प्रवहनावर लक्ष केंद्रित करायला सांगितले. मी असे म्हणताक्षणी सर्व चिमण्या शांत झाल्या आणि सत्र पूर्ण होईपर्यंत संपूर्ण ५ मिनिटे शांत राहिल्या! सत्र संपल्यानंतर जेव्हा मुलांनी डोळे उघडले आणि बोलायला सुरुवात केली तेव्हा चिमण्यांची ‘चिव चिव’ देखील सुरू झाली!

– संतोष कोरे, प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

हवेत काहीतरी अधिक प्रभावी आहे. ते स्तब्ध असले तरीही शक्तिशाली आहे. ते नेहमीच इथे होते पण आता ते स्वत:च्या उपस्थितीची जाणीव करून देत आहे. ते थोड्या किंवा अधिक प्रमाणात बहुतेक रहिवाशांमध्ये आणि बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा दिसून येते. लोक मनापासून स्मित करत आहेत आणि त्यांच्या आवाजात निश्चितता आहे, विश्वास आहे. तपोनगरातील नव युगाच्या ऊर्जांचे हे तीव्रीकरण आहे. अंतर्गत कोठेतरी प्रकाश युगाचा उंबरठा ओलांडला गेला आहे. तपोनगरातील प्रबल ऊर्जा लोकांना स्पष्ट निवड करण्याकडे रेटत आहेत. खूप प्रतीक्षित असलेल्या ह्या वर्षाच्या पहिल्या महिन्याने स्पष्टता आणली.

जानेवारी महिन्यात शंबला वर्ग आणि ‘रा’ वर्ग झाले. शंबला वर्गात पहिल्यांदा भाग घेणाऱ्या ध्यानसाधकांच्या नव्या बॅचला दीक्षा देण्यात आली. १ फेब्रुवारी, ‘वर्ल्ड चॅनल्स डे’ ची तयारी जोरात चालू होती. बैठका चालू होत्या आणि एक निष्ठ गट काटेकोरपणे बारीकसारीक गोष्टींची तयारी करीत होता. इथे पुन्हा त्यांच्या उत्साहाची तीव्रता कमी न होऊ देता प्रकाश प्रवहनाचे स्वयंसेवक त्यांच्या आचरणात सखोल वाटत होते. गेल्या दोन वर्षांच्या अनुभवाने त्यांच्या पद्धतींमध्ये गहनता आणली होती.

त्याचवेळी अभ्यास केंद्राचे सदस्य महर्षी अमर जयंतीला प्रकाशित होणारी पुस्तके त्यांच्या लॅपटॉप्सवर लिहिण्यात आणि पूर्ण करण्यात व्यस्त होते. महर्षी अमर जयंती समारंभाच्या तयारींना सुरुवात झाली. प्रसाद, फुलांची सजावट, स्वयंसेवकांच्या कामाचे वाटप इत्यादींचे नियोजन पूर्ण झाले.

रहिवाशांच्या भेटीत गुरुजींसोबत होणाऱ्या सुसंवादास गहनता आली आहे. नि:शब्दपणे आणि सामर्थ्याने तपोनगराने संधींच्या या वर्षात प्रवेश केला. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: जयंत देशपांडे)

०१–०१–२०१२

एकदा का आपण प्रकाशाला जाणले, त्याला अनुभवले की, आपण सत्ययुगात असू. हा एक महान अनुभव आहे.

शून्यमासात शिवलोकातून आलेले महान ऋषी म्हणाले, 'प्रथम २०१२ सालाशी निगडित विनाशाबद्दल भीती मनातून काढून टाका आणि चांगल्याचीच आशा ठेवा. हे वर्ष एक महान वर्ष असेल कारण थोड्या प्रयत्नांनीच आपण खूप काही मिळवू शकू.' फक्त निवड करा, मनात तीव्र इच्छा बाळगा, तेवढेच पुरे आहे. या वर्षात प्रकाशयुगाची किल्ली सापडेल. या किल्लीचा वापर करून आपल्यासाठी आणि या जगासाठी नव्या नियतींचे निर्माण करणे आपल्या हातात आहे. या वर्षाने आतापर्यंत गोळा केलेल्या सर्व ऊर्जा आणि त्याशिवाय विशेष ऊर्जा सुद्धा सोबत आणल्या आहेत. या ऊर्जा प्रसारित करण्यापूर्वी हे वर्ष ऋषींचा सल्ला घेईल. या ऊर्जा आपल्याला जीवनातील विविध गोष्टींचा अग्रक्रम ठरवण्यात मदत करतील. त्याचप्रमाणे हे वर्ष आपल्या संबंधांमध्ये स्पष्टता आणेल, फक्त परस्परांच्या संबंधांमध्येच नव्हे तर प्रकाशाशी, ऋषींशी, गुरूंशी, निसर्गाशी, पृथ्वीमातेशी आणि या वर्षाशी असलेल्या आपल्या संबंधांमध्येही स्पष्टता आणेल. हे वर्ष आपल्या ध्येयांमध्ये स्पष्टता आणेल. या वर्षात आपण परमेश्वराच्या, प्रकाशाच्या जवळ जाऊ.

निवाड्याचा दिवस म्हणजे एक दिवस नसून एक काळ आहे ज्याची सुरुवात खिसमसच्या दिवशी दुपारी १२ वाजतापासून झाली आहे. आपल्याला बरेवाईट ठरवण्याचा हा काळ नाहीये. आपण आपल्या परीने साधना केली आहे. भगवान कल्की आपल्याला देणग्या द्यायला सुरुवात करतील. हा एक उत्तम संधींचा काळ सुद्धा आहे. आपण जर निवड केली, मनातून इच्छा केली तर भगवान कल्की आपली मदत करतील, आपल्याला साधनेत पुढे नेतील, हे आपल्याला माहीत असल्यास त्याचा फायदा होतो. आपल्या कमतरता स्वीकारा, क्षमा मागा आणि कमतरता दूर करा. आपल्याशी सूक्ष्म पातळीवर संपर्क साधण्यात येईल आणि नंतर कदाचित प्रत्यक्षपणे संपर्क साधण्यात येईल.

जेव्हा आपण नकारात्मकता बाळगत नाही आणि जेव्हा आपले मन पूर्वग्रहरहित असते तेव्हाच आपण उच्च व्यक्तित्वांशी संपर्क साधू शकतो. निम्न जगांतील लोक सुद्धा आपल्याशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नात आहेत. आपला जर उच्च जगांतील आत्म्यांशी संपर्क झाला तर आपण आपल्या अंत:प्रेरणेच्या मदतीने ते जाणू शकतो. अशा संपर्कामुळे आपल्याला परमेश्वराच्या जवळ जाण्यासाठी, उदात्त बनण्यासाठी मदत व्हायला हवी. अन्यायाविरुद्ध राग येणे चांगले आहे पण आपल्याला न आवडणाऱ्या एखाद्या व्यक्तीविरुद्ध राग, काळ्या ऊर्जांना आमंत्रण देतो. आपण सावध राहायला हवे.

आपल्यातील नकारात्मकता परमेश्वर सुद्धा काढू शकत नाही. ते काम आपले आपल्यालाच करावे लागेल. मास्टर व्ही आणि परमेश्वर मदत करतील.

पहिल्या शंबला तत्त्वाचा अभ्यास करून विश्वाचा अनुभव घ्या. मग तुम्हाला कधीही राग येणार नाही; तुमचे स्वास्थ्य सुधारेल, जीवनाबद्दल तुमचा दृष्टिकोन बदलेल आणि तुम्ही एक परिपक्व माणूस बनाल. जीवनात तुम्ही योग्य निर्णय घेऊ शकाल.

'प्रेमाची निवड करा म्हणजे तुम्ही माझी निवड कराल, निष्प्रेमाची निवड करा आणि तुम्ही मला डावलाल.' नववर्षानिमित्त हा माझा संदेश आहे.

ऋषी सांगत आहेत की, तुम्ही रा आणि शंबला गटांपैकी एका गटाची निवड करा. कोणत्याही एका गोष्टीवर विशेषता मिळवावी, ही त्यामागील भावना आहे. ऋषी आपल्याला पुष्कळ मार्गांनी प्रशिक्षण देऊ इच्छितात. त्यांनी सांगितले की, जेव्हा ते एका व्यक्तीला प्रत्यक्ष इथे किंवा इतर कोठेही सूक्ष्म पातळीवर दीक्षा देतात, तेव्हा ते त्यांच्या छत्राखाली त्याचा स्वीकार करतात.

०८–०१–२०१२

जेव्हा आपण प्रकाशाच्या महासागरात प्रवेश करतो तेव्हा अंतर नाहीसे होते; कोणत्याही आयामात आपल्याला प्रवेश मिळू शकतो. उच्च आत्म्यांशी, ऋषींशी आणि देवदूतांशी संपर्क साधण्यात ह्याची मदत होते. फक्त प्रकाशाच्या महासागराचा विचार करा आणि तुम्ही त्यात असाल. मग तुमच्या समोर ऋषींची किंवा एखाद्या देवतेची कल्पना करा. आणि मग तुम्ही त्यांच्याशी संवाद साधू शकाल. आपल्या थोड्या सरावाने आणि जास्त ऋषींच्या मदतीने संपर्क होणे शक्य आहे.

पृथ्वीवर ऊर्जांच्या प्रसारणाची संपूर्ण योजना, या नववर्षाच्या ऊरात आहे. प्रकाशाच्या महासागरात प्रवेश करा; एका देवतेच्या रूपात नववर्षाची कल्पना करा आणि तुम्ही त्याच्याशी संवाद साधू शकाल, या वर्षात काय संभाव्य आहे ते त्याला विचारू शकाल. नवयुगात प्रवेश करण्यासाठी तयारी करण्यास ह्याचा आपल्याला उपयोग होईल. नववर्षाने पहिल्यांदाच नवयुगाच्या काही ऊर्जा प्रसारित केल्या आहेत. या ऊर्जा आपल्याला जागृत करण्यात मदत करतात. कोणी जर आधीच जागृत असेल तर त्याला अधिक जागृत होण्यात मदत मिळते. ही एक अनंत प्रक्रिया आहे. आपल्यापैकी जवळ जवळ सर्वांनाच असे वाटते की, आपण नवयुगाची निवड केलेली आहे. पण आपण प्रेमाची निवड पूर्णपणे करायला हवी. या ऊर्जा आपल्याला स्पष्ट निवड करण्यात आणि मागे न फिरण्यात मदत करतात. या ऊर्जा आपल्याला परिस्थिती आणि समस्यांना समजून घेण्यात आणि त्याप्रमाणे आपला मार्ग सुधारण्यात आपली मदत करतात.

ध्यान ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यात आपण स्तब्धतेत प्रवेश करतो. ध्यान करताना आपण प्रार्थना करू नये किंवा बोलू नये. स्तब्धतेत आपण आपल्या जाणिवेला उंच उठू द्यायला हवे, विस्तारू द्यायला हवे. ध्यान करताना आपण काहीच करायला नको; फक्त स्तब्ध राहायला हवे. आपण इतरवेळी प्रार्थना करू शकतो, ध्यान करताना नव्हे.

ध्यान, योग, हीलिंग इत्यादींच्या नावाने एक उद्योग काही वर्षांपासून वाढतो आहे. अध्यात्माच्या नावाखाली लोक पैसा गोळा करत आहेत. एका भोळ्या महिलेने हप्त्यांमध्ये फी भरण्यासाठी परवानगी घेऊन एक कोर्स केला. कोर्सच्या मध्यात ती काही वर्गांना जाऊ शकली नाही. त्यांनी तिला सांगितले, 'फी वेळेवर न भरू शकल्यामुळे, तू कर्म गोळा केली आणि म्हणून तू वर्गांना येऊ शकली नाहीस.' जे लोक अध्यात्माच्या नावाने पैसा गोळा करतात, कदाचित ते कर्म गोळा करत असतील, पण शोषित भोळेभाबडे लोक नाही.

एका माणसाने मला सांगितले की, तो खूप उतावळ्या स्वभावाचा आहे आणि भिडस्तपणामुळे कधीकधी लोकांशी बोलायला संकोच करतो. त्याने मदतीसाठी याचना केली. अशावेळी त्याने समाजात वावरून, लोकांशी बोलून जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत; आम्ही ऊर्जा देऊन त्याची मदत करू शकतो. हे जग आपली प्रयोगशाळा आहे. आपल्या अवतीभोवती असलेले लोक आपले शिक्षक आहेत.

जेव्हाही आपण एखादी नकारात्मक भावना मनात बाळगतो, तेव्हा आपल्या मनावर त्याचा ताण पडतो. नेहमी शांत, आनंदी आणि ताणरहित राहण्यासाठी तुम्ही शंबलाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या तत्वाचे आचरण करा. मग आपण कोणतीही परिस्थिती किंवा समस्या हाताळू शकतो.

आपल्या स्वयंसेवकांनी व ध्यानसाधनेची

# गुरुजी उवाच

( गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
( संकलनः शोभा राव; अनुवादः जयंत देशपांडे)

तपासणी करणाऱ्या लोकांनी ध्यान हे करायलाच हवे. जर तुम्ही नियमितपणे ध्यान करत नसाल तर आतापासून जरूर सुरू करा.

१५-०१-२०१२

जेव्हा आपण प्रकाशाच्या महासागराचा अनुभव घेतो, तेव्हा आपण जणू काही आपल्या घरी परत गेलेलो असतो. जसे आपल्या घरी आपण पूर्णपणे निवांत असतो, तसे आपल्याला वाटते. प्रकाशाच्या महासागरात परमानंद असतो. प्रकाशाचा महासागर अनुभवताना आपण प्रकाशाच्या गाभ्यात असतो. तिथे नीरव स्तब्धता असते. आपण पूर्णत्व अनुभवतो. तिथे आपल्याला सुरक्षित व परिपूर्ण वाटते. या जगातील इतर सर्व गोष्टी आपल्याला दूरवर असल्यासारख्या जाणवतात. या गोष्टींची आपल्याला जाणीव असायला हवी.

आजपासून आपण उत्तरायणात प्रवेश करीत आहोत. आज एक स्थित्यंतर घडणार आहे. हे उत्तरायण फार महत्त्वाचे आहे. पुढील सहा महिन्यांत आपल्याला प्रगती करण्यासाठी, स्वतःला परिपूर्ण बनवण्यासाठी खूप संधी मिळतील. याचा आपल्याला या वर्षाच्या उत्तरार्धात म्हणजे दक्षिणायनात उपयोग होईल, जेव्हा जीवनाच्या भौतिक बाजूकडे आपण लक्ष घालू.

शून्यमासात शिवलोकातून आलेले ऋषी सांगतात की, ही पृथ्वी अद्वितीय आहे. आपल्याला ह्याची जाणीव नाही. सध्या सत्तेच्या सर्व पातळ्यांवर काळ्या लोकांची सत्ता आपल्यावर आहे. ऋषींनी पाहिले आहे की, आपल्या या ग्रहावर खूप प्रेमभाव आहे आणि खूप लोक अध्यात्माकडे वळत आहेत. ते म्हणतात की, पृथ्वीवर उपलब्ध ऊर्जा आणि ज्ञानाचा वापर होत नाहीये, खासकरून या सप्त ऋषी केंद्रातील लोक ह्यांचा उपयोग करत नाहीयेत.

शिवलोकातील ऋषींनी पाहिले आहे की आपण चांगले आहोत पण आत्मसंतुष्ट आहोत. आपण २०१२ ह्या सालाला गंभीरतेने घ्यायला हवे. ऋषींनी इथे व संपूर्ण जगात ऊर्जा पसरवल्या आहेत. त्यांनी कॉस्मिक टॉवरमध्ये संपूर्ण जगासाठी ऊर्जा साठवून ठेवल्या आहेत. या ऊर्जा हळूहळू, योग्य वेळेवर सोडण्यात आणि पसरवण्यात येतील. जेव्हा लोक तयार असतील तेव्हा ज्ञान आणि ऊर्जा त्यांच्यापर्यंत पोचतील.

शिवलोकातील या ऋषींनी या वर्षा अखेरीस संभाव्य विनाश टाळण्याचे फार महत्त्वाचे काम केले. २०१२ नंतर रोगराईच्या प्रतिबंधनाकरता त्यांनी एकप्रकारची योजना आखली आहे. शेवटी ते म्हणाले की, ते आपल्यावर खूप खुश आहेत.

दोन व्यक्तिंचे लग्न ठरत होते पण त्यांची पत्रिका जुळत नव्हती. त्यांनी मला विचारले, 'पत्रिका जुळत नसतानाही आम्ही लग्न करू शकतो का?' माझे त्यांना उत्तर होते, 'ध्यान करायला सुरुवात करा आणि मग तुम्ही लग्न करू शकता.'

पुष्कळ लोकांनी कॅलेंडर्ससाठी त्यांची नावे दिलीत, पण त्यांनी कॅलेंडर्स घेतली नाहीत. आध्यात्मिकतेची सुरुवात जीवनातील बारीकसारीक गोष्टी योग्यपणे करण्यापासून होत असते. फक्त ध्यान करून आपण आध्यात्मिक होऊ शकत नाही.

प्रकाशाचे प्रवहन करणारी मुले प्रकाशाला ओळखू शकतात. हे फार प्रगत आत्मे आहेत. ते आपली आशा आहेत.

२२-०१-२०१२

तुम्ही फक्त एकदा जरी प्रकाश अनुभवला तर तुमचे संपूर्ण जीवनच बदलते. पुष्कळ साधक काही क्षणांसाठी प्रकाश अनुभवतात. या अनुभवाला आणखी थोडा काळ रेंगाळू द्या; संपूर्ण आयुष्यभर त्याचा प्रभाव राहू द्या. मग तुमच्यात निष्प्रेमाचा एक अंश सुद्धा राहणार नाही.

शून्य मासात इथे आलेल्या ऋषींनी जी माहिती दिली त्यातील काही माहिती मी तुम्हाला देत आहे. ते म्हणतात की, पुढील काही दिवसांमध्ये या जगातच नाही तर आपल्या मनातही खूप गोंधळ माजेल. आपण जर ध्यान केले, प्रकाश अनुभवला तर गोंधळ, पहाटेच्या धुक्याप्रमाणे थोड्या वेळातच नाहीसा होईल. आपल्या आयुष्यात मूक चमत्कार घडतील. अशा गोष्टींचा परमेश्वराकडून मिळालेला उपहार म्हणून कृतज्ञतेने स्वीकार करावा. दैनंदिन जीवनात आणि २०१२ सालाशी निगडित घटनांमधून सुखरूप तरून जाण्यासाठी आपण निष्प्रेमाचा लवकरात लवकर त्याग करणे फार महत्त्वाचे आहे.

लोकांना विशेष तंत्र शिकवून वैयक्तिकरीत्या प्रशिक्षित करण्याची माझी इच्छा आहे. तुमच्या भावनांचा व वर्तणुकीचा दर्जा तपासून बघा. तुम्हाला जर वाटत असेल की, तुम्ही तयार आहात तर माझ्याकडे या. शंबला तत्त्वांचा रोज अभ्यास करणे खूप महत्त्वाचे आहे. पहिल्या व दुसऱ्या शंबला तत्त्वाचे ऍनिमेशन आपल्या वेबसाईटवर आहे. ते तुम्ही बघावे.

एक चांगला व सच्छील माणूस म्हणाला, 'मी जे करतो आहे, ते चुकीचे आहे, हे माहीत असूनही मी ते करतो आणि जे योग्य आहे ते मी करू शकत नाही. तर मी काय करू?' मनापासून इच्छा करा आणि ठरवा की जे योग्य आहे तेच तुम्हाला करायचे आहे. तुमच्या मनात येणाऱ्या अगदी पहिल्या नकारात्मक विचाराला सुद्धा नाकारा. तसेच जे काही चूक आहे असे तुम्हाला वातते त्याला नाकारा. ध्यान करा, शंबला तत्त्वांचा अभ्यास करा. प्रयत्न करा आणि नकारात्मकता मनातून समूळ काढून टाका.

एका व्यक्तीला, मुलांना शाळेत तयार करून पाठवण्यासाठी पहाटे लवकर उठावे लागत असे. तिला घाई होत असे आणि तिच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी तिला धडपड करावी लागत असे. काही दिवसांनी तिच्या हे लक्षात आले की, तिला उठायला उशीर होतो आहे आणि मुलांना तयार करण्यासाठी फक्त दहा मिनिटेच राहत आहेत. असे असूनही शाळेत पोचल्यानंतर तिच्या हे लक्षात येत होते की, दहा मिनिटे आधीच ती शाळेत पोचते आहे!! त्या विशिष्ट दिवसांमध्ये तिच्यासाठी काळ विस्तारित होत होता. आपल्याला परमेश्वराला काहीही मागण्याची आवश्यकता नाही. जेव्हा आपण पात्र असतो, तेव्हा आपल्या आयुष्यात आपोआपच गोष्टी घडतात. खरंतर आपल्याला हे माहीत नाही की या मदतीसाठी आपण पात्र आहोत किंवा नाही पण परमेश्वराच्या प्रेमामुळे, ऋषींच्या प्रेमामुळे सगळीकडून आपल्याला मदत मिळते.

तुम्ही जर स्तब्धता अनुभवाल तर तुम्ही तुमच्या मनातून निष्प्रेम आणि नकारात्मकता काढून टाकू शकाल. ऋषींचे प्रेम, त्यांच्याकडून मिळणाऱ्या ऊर्जा आणि त्यांची कृपा आपल्याला मदत करते. जेव्हा लोकांना हे माहीत असते तेव्हाही लोक दुसरीकडे मदतीसाठी का जातात?

२०१२ सालात आपण प्रवेश केला पण आहे आणि कित्येक वर्षांच्या साधनेनंतर अजूनही आपण निष्प्रेम मनातून काढून टाकण्यासाठी धडपड करीत आहोत, अशा अनेक भावना व विचारांनी, गुरुवारी १९ जानेवारीच्या रात्री, माझे मन व्याकूळ झाले होते. त्यावेळी एकाएकी काहीतरी झाले. माझे मन एकाएकी उत्साहित झाले. मला कळले की मला काय करायचे आहे, कसे लोकांना मार्गदर्शन करायचे आहे. उच्च शक्तींच्या मार्फत या जगाला कशी मदत मिळणार आहे. मी ऋषींचे आभार मानले. त्यांनी सांगितले की त्यांनी माझ्या उच्च आत्म्याला माझ्यात प्रवेश करू दिला आहे. माझ्याजवळ खूप माहिती आहे आणि तंत्र आहेत. तुमची माझ्याकडे येण्याची मी आतुरतेने वाट बघत आहे. त्यासाठी तुम्ही तयारी करा. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

शोभा राव, अनुवाद : एकनाथ कुलकर्णी

आतापर्यंत मी हजारो डॉलर्स खर्च करून अनेक वर्कशॉप्स, कोर्सेस आणि आध्यात्मिक सहलींमध्ये देखील भाग घेतला. मी विचार करू लागले की, आध्यात्मिकता काही स्वस्त नाही आणि परमेश्वराचा शोध घेण्यासाठी मला इतके पैसे खर्च करावे लागले. मी स्वत:ला विचारले 'ज्या लोकांकडे आर्थिक विपुलता नाही, ते देवाचा शोध कसा बरं घेतील?' आता मला समजून चुकले आहे की परमेश्वरापर्यंत पोहोचण्यासाठी पैशाची गरज नाही. मला माहीत आहे आणि मी अत्यंत कृतज्ञ आहे की, ज्याचा मी इतके दिवस शोध घेत होते ते आता मला सापडले आहे.

– ॲन चॅपमन

आता मला माझ्या विचारांच्या, भावनांच्या आणि कृतींच्या दर्जाची पूर्ण जाणीव असते. मी आता भावनातिरेकावर संयम ठेवू शकतो. कोणाशीही बोलताना मी गुरुजींनी शिकवलेल्या मूल्यांची आठवण मनात ठेवण्यासाठी माझ्या जाणिवेचा वापर करतो. माझ्या विचारसरणीची जी पातळी मला ऋषींना दाखवायला आवडेल, ती पातळी गाठण्यासाठी मी माझ्या विचारसरणीला आव्हान देतो.

– राकेश मिश्रा

ध्यानसाधनेमुळे आणि ऊर्जा ग्रहण केल्यामुळे शल्य चिकित्सेनंतर मी लवकरच बरी झाले. मला वेदना शमवण्याकरता औषधे घ्यावी लागली नाहीत. हे अद्भुत होते. तसेच माझ्या शल्यचिकित्सेसाठी इंश्युरंस कंपनीने खर्च देण्याचे नाकारल्यामुळे जी समस्या उद्भवली होती, तिचेही समाधान झाले. मी ऋषींचे आणि प्रकाशाचे मन:पूर्वक आभार मानते.

– भारती दुधिया

माझी मनापासून खूप इच्छा होती की, माझ्या शाळेमध्ये पण प्रकाशाच्या प्रवहनाचे एक सत्र झाले पाहिजे, परंतु शाळेच्या अधिकाऱ्यांकडून त्यासाठी परवानगी मिळण्यात साशंकता होती.

इतक्यातच आमच्या शाळेमध्ये प्रकाशाच्या प्रवहनाचे एक सत्र झाले. सर्व मुलांनी खूप लक्ष देऊन प्रकाश प्रवहनाबद्दल ऐकले! खरोखरच माझ्या दृष्टीने ही एक विस्मयकारक घटना होती आणि मला अनेक गोष्टी उमगल्या. मी अजूनपर्यंत अत्यानंदाच्या लाटेवर स्वार आहे.

– दीक्षा सुरेश

मी जवळजवळ संपूर्ण दिवस स्वत:मध्ये प्रकाश भरून घेते आणि सहसा कधी थकत नाही. मी लोकांशी आणि जागांशी सुसंवाद साधते. एका दूर्मिळ शांततेचा मी अनुभव करीत आहे. फारसे श्रम न करता माझे जीवन सुरळीतपणे सुरू आहे. घरातील किंवा ऑफिसमधील सर्व प्रकारच्या समस्या चमत्कारिकपणे नाहीशा झाल्या आहेत.

– रमा देवी

प्रकाशाचे प्रवहन करणे आणि याबद्दल इतरांना सांगणे आता आधीपेक्षा सोपे झाले आहे कारण लोक आता ऐकायला आणि समजून घ्यायला तयार असतात. माझ्या मनोवृत्तीचे रूपांतरण होत आहे आणि मी जास्त शांत, कनवाळू आणि सहिष्णू झाले आहे आणि इतरांचे नकारात्मक शेरे मी माझ्या मनाला लावून घेत नाही.

– जयंती नटराजन

मी निश्चितच स्वत:मध्ये एक कायम स्वरूपाचे परिवर्तन पाहात आहे. मला हे आत्मचिंतनातून स्पष्ट होते आहे. माझ्या मनामध्ये जे प्रश्न उभे राहातात त्यांची उत्तरे आपण अतिशय सुंदरपणे देता आणि लोकांशी निर्भयपणे बोलण्याची आणि त्यांच्याशी व्यवहार करण्याची माझी क्षमता वाढली आहे.

– फिरोजा पांडे

कधीकधी मी माझ्या आत्म्याबद्दल विस्मय करते आणि त्याबाबत अधिक जाणून घेणे मला आवडते कारण माझा आत्मा शक्तीमान आहे, त्याचे लक्ष त्याच्या ध्येयावर केंद्रित आहे, तो उत्स्फूर्त आहे आणि आध्यात्मिक मार्ग आणि कामाला समर्पित आहे. तो केव्हाही माझ्या शरीराला किंवा मनाला, मला चुकीचा मार्ग दाखवू देणार नाही. तसेच तो मला प्रयत्न करणेही सोडू देणार नाही किंवा आरामही करू देणार नाही! हे एक रोजचेच आव्हान झाले आहे परंतु असा आत्मा असल्यामुळे जे अशक्य आहे ते शक्य झाले आहे.

– विद्या विश्वामित्र

जेव्हा मी माइक्रोसॉफ्ट मध्ये काम करत होते तेव्हा प्रशिक्षण सत्रांच्या शेवटी आम्हाला टी-शर्ट, बॅग किंवा इतर भेट वस्तू मिळत. मला असे वाटते की, तसाच, गेल्या दोन महिन्यांचा कालावधी हा एक प्रकारे ऋषींनी दिलेल्या प्रशिक्षण सत्राचा काळ होता. इतक्या कमी वेळामध्ये मला अनेक भेट वस्तू आणि शिकवण मिळाली!

– सौम्या अजय

आपण जवळ असता, आयुष्य किती सोपे आहे! आपणास भेटणे शक्य असल्यामुळे वेळोवेळी मी आपले मार्गदर्शन घेते. याची मला कल्पना आहे की आपल्यापुढे फार मोठे कार्य आहे, तरीही एखाद्या लहान मुलाप्रमाणे, जे आपल्या आई-वडिलांकडे प्रत्येक पाऊल उचलताना पाहते, मी आपल्याकडे पाहत असते.

– जस्प्रीत कौर

# प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. प्रकाशयुग स्थापन करणे हे मानसा कुटुंबाचे कार्य आहे का?**

उ. ऋषींच्या हाताखाली काम करणे हे आपले कार्य आहे. प्रकाशयुग स्थापन करणे ही अर्थातच एक फार मोठी जबाबदारी आहे; ती ऋषी पूर्ण करतील.

**प्र. आपली शरीरे नव्या उर्जा ग्रहण करण्यासाठी का तयार नाहीत ?**

उ. नव्या उर्जांसाठी फक्त शरीरच नाही तर संपूर्ण शरीरसंस्थाच तयार नाही. शरीरसंस्थेच्या प्रत्येक घटकासाठी (मन, बुद्धी इ.) कारणे वेगवेगळी आहेत. सर्वसामान्यपणे जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणाने जो अहंकार आणि नकारात्मकता आपण अजूनही बाळगतो आहोत, ती नव्या ऊर्जांना आपल्यात प्रवेश करू देत नाही. त्यांना आपल्यातून आपण काढून टाकायला हवे. थोड्या प्रयत्नांनी आपण ते करू शकतो.

**प्र. जेव्हा आपल्याला अनुभव येतात तेव्हा आपल्याला ऊर्जा मिळतात का?**

उ. होय. मिळतात. आध्यात्मिक अनुभवांमुळे आपल्याला खूप ऊर्जा मिळतात. मानसिक अनुभवांमुळे सुद्धा आपल्याला ऊर्जा मिळतात.

**प्र. आपण जेव्हा ऋषींना प्रार्थना करतो, तेव्हा देखील आपल्याला ऊर्जा मिळतात का?**

उ. ऋषींना केवळ आठवल्यानेच आपण त्यांच्याशी जोडले जातो. ऋषींचे आपल्यावर नितांत प्रेम आहे. जसे पाणी वरून खाली वाहते, त्याचप्रमाणे त्यांच्याकडून स्वाभाविकच प्रेम, प्रकाश आणि ऊर्जा आपल्याला मिळतात.

**प्र. भौतिक शरीरातून प्रकाश शरीरात होणारे रूपांतरण ही एक त्रासदायक प्रक्रिया आहे का?**

उ. आपण त्या प्रक्रियेची सुरवात करायला हवी. त्यासाठी जर तुम्ही तयार असाल तर ती एक सुखावह आणि सहज प्रक्रिया आहे.

**प्र. हे शरीर, प्रकाश शरीरात हळूहळू रूपांतरित होत असताना, रूपांतरणाच्या भिन्न भिन्न अशा अवस्था असतात का?**

उ. होय. असे टप्पे असतात. अद्याप आपल्याला स्पष्टपणे संपूर्ण प्रक्रिया समजलेली नाही. पण मला असे वाटते की, या प्रक्रिया जास्त करून मनाशी निगडित आहेत. जर आपण मन शुद्ध केले तर शरीर आपोआपच प्रकाशमय बनेल.

**प्र. सदोदित प्रकाशाला बाळगल्याने रूपांतरणात मदत होते का?**

उ. होय. प्रकाशाला नेहमी बाळगा, प्रक्रियेचा वेग वाढेल.

**प्र. आध्यात्मिक कार्यात सामील असणाऱ्या लोकांसाठी परीक्षेची काय आवश्यकता असते?**

उ. अहंकारावर आवर घालण्यासाठी. परमेश्वराची आठवण राहण्यासाठी, विनम्र राहण्यासाठी, आपल्याला सतत परीक्षांमधून जावे लागते.

**प्र. आपल्याला जर आपली कर्मे माहीत झाली, तर परत चुका न करण्यात त्याची आपल्याला मदत होणार नाही का?**

उ. हो, ते शक्य आहे. तसे होऊ शकते. पण अनुभवाने हे कळले आहे की, तसे होत नाही. आपण परत परत त्याच चुका करतो. म्हणून आपली कर्मे काय आहेत हे माहीत असूनही त्याचा काही उपयोग होत नाही.

**प्र. संपूर्ण विश्वात महात्मे एकाच नावाने ओळखले जातात का?**

उ. नाही. असेच काही नाही. कदाचित विश्वामित्र महर्षींसारखे काहीच महात्मे सगळीकडे एकाच नावाने ओळखल्या जातात.

**प्र. आपल्या ध्यानवर्गात, सूक्ष्मरूपात असणाऱ्या व्यक्तित्वांच्या उपस्थितीची, आपल्याला कशी मदत होते?**

उ. ते इथे आपली मदत करायला नाही तर सूक्ष्मरूपात वर्गाला उपस्थित असलेल्या ऋषींना भेटायला येतात. त्यांची नुसती उपस्थिती परिणामकारक असते. ते महान ऊर्जा बाळगून असतात आणि त्यांच्यासोबत ते प्रचंड ज्ञान पण आणतात. हे ज्ञान ते आपल्याला देऊ पण शकतात. या पातळीवर आपल्याला या गोष्टी माहीत पण राहणार नाही पण एका भिन्न पातळीवर आपल्याला ह्याची जाणीव राहील.

**प्र. आपण मंदिरांकडे, या कुंडलिनी टॉवर सारख्या जागांकडे का ओढल्या जातो? तेथील ऊर्जांमुळे असे होते का?**

उ. होय. तेथील ऊर्जांमुळे असे होते. अशा जागांमध्ये असे काही आध्यात्मिक चुंबकत्व आहे जे आध्यात्मिकरीत्या तयार असणाऱ्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करते. अशा ठिकाणी आपण प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही. तुम्ही सूक्ष्मदेहात तिथे जाऊ शकता किंवा मानसिक संपर्क साधून तेथील ऊर्जा आणि लाभ मिळवू शकता. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे | |
| सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे ''मानसी'' नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

दि. ३० नोव्हेंबर रोजी मी नाराज होतो कारण माझ्या कार्यालयातील सहकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या सूचनांप्रमाणे काम केले नव्हते. अचानकपणे माझ्या मोबाइलवर येशू खिस्तांचा फोटो पाहून मी आश्चर्यचकित झालो. पूर्वी कधीही मी तसा फोटो माझ्या मोबाइलवर ठेवलेला नव्हता. त्या दिवसाअखेर आम्ही काम संपवून, आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हवी ती माहिती सादर करू शकलो. या अनुभवातून मला कळले की येशू खिस्त माझ्या सोबत आहेत आणि हा अनुभव त्यांचाच आशीर्वाद होता.

– संतोष कोरे

कॅनडा येथील माझ्या मैत्रीणीचे मांजर खूप अशक्त झाले होते. डॉक्टरांचे औषध चालू असूनही बऱ्याच दिवसांपासून त्याने काही खाल्ले नव्हते आणि त्यामुळे साधी हालचाल देखील ते करू शकत नव्हते. तिने त्याचा फोटो माझ्याकडे पाठवला व मला त्याला उपचारक ऊर्जा पाठविण्याची विनंती केली. ताबडतोब मी त्याला रेकी व प्रकाश पाठविला. त्यानंतर फोटोमधील मांजराचे डोळे मिचकवणे व मान डोलावणे पाहून मी थक्क होऊन गेले! मला कळले की मी त्या मांजराशी जोडले गेले होते आणि ते आता ठीक होते. दुसऱ्या दिवशी माझ्या मैत्रीणीने फोन करून कळविले की तिचे मांजर व्यवस्थित खात होते व ते ठीक होते !

– हिला माझदा

खिसमसच्या दिवशी मी प्रभू येशूंशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. ते मला म्हणाले, मी म्हणालो होतो की माझ्या ऊर्जा पुढील २४ तासांसाठी उपलब्ध राहतील. पण या वर्षात माझ्या शक्तींचे आवाहन कोणीही, माझ्या कोणत्याही रूपाद्वारे, कधीही करू शकेल. जीवनात प्रेमाचे प्रकटीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने स्वत:वर प्रेम केले पाहिजे. एकदा का आपण स्वत:वर प्रेम करण्यास शिकलो व स्वत:मध्ये सर्वस्वाचा अनुभव घेतला तर आपोआपच आपण प्रत्येकावर व प्रत्येक गोष्टीवर प्रेम करू लागतो.

– प्रियांका मिश्रा

माझी तीन वर्षाची लहान मुलगी, मला पुष्कळदा प्रकाश प्रवाहित करत असताना पाहते. तिने मला त्याबाबत विचारले व म्हणाली की तिचीही प्रकाश प्रवाहित करण्याची इच्छा आहे. तिला मी प्रवहनाचे तंत्र शिकविले. आता ती पुष्कळदा ३ मिनिटांसाठी प्रकाशाचे प्रवहन करते. जेव्हाही तिला इजा होते ती मला तिच्याकडे प्रकाश प्रवाहित करण्यास सांगते. जेव्हा मी प्रकाश प्रवाहित करते, तिचे दुखणे नाहीसे झाल्याचे ती मला सांगते! माझ्या लहानग्या मुलीला प्रकाश प्रवहनात सहभागी होताना पाहून मला खूप छान वाटते. प्रकाशासोबत एकतानता साधण्यात गुरुजींच्या आशीर्वादांची मदत तिला मिळाली आहे.

– प्रियंवदा गोडसे

## FORM IV

(नियम ८, प्रेस आणि रेग्युलेशन ऑफ बुक ॲक्ट खाली)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशमार्ग | वृत्तपत्रचे शीर्षक |
| २. | रजिस्ट्रेशन क्र. | KARMAR/2008/27314 |
| ३. | प्रकाशनस्थळ | बंगलोर |
| ४. | प्रकाशन आवृत्ती | मासिक |
| ५. | संपादक, प्रकाशक आणि मुद्रकाचे नाव | जयंत देशपांडे |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | तपोनगर, चिक्कगुब्बि, ऑफ हेन्नूर-बागलूर रोड, बंगलोर अर्बन – ५६० ०७७ |
| ६. | मुद्रण स्थळ | आर्ट प्रिंट, ७१९/ए, वेस्ट ऑफ कॉर्ड रोड, स्टेज २, राजाजीनगर, बंगलोर – ५६० ०८६ |
| ७. | मालकाचे नाव | मानसा फाऊंडेशन (रजिस्टर्ड) |

मी, जयंत देशपांडे, हे घोषित करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे अगदी खरी आहे असा माझा विश्वास आहे.

बंगलोर
ता: २५-२-२०११

सही
जयंत देशपांडे
संपादक, प्रकाशक आणि मुद्रक

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande